# ❊ प्रास्ताविक ❊

# डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व : एक राजकीय अभ्यास

## प्रास्ताविक

'डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व एक राजकीय अभ्यास ' हा विषय एम.फिल. च्या शोधनिबंधासाठी निवडला आहे. या विषयाची निवड करीत असताना काही उद्देश समोर ठेवला होता त्या दृष्टीने अभ्यासाची दिशा निश्चित केलेली होती.

नेतृत्त्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्त्वही स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्त्व म्हणजे काय? या प्रश्नाचे सोपे सुटसुटीत व सर्वसमावेशक उत्तर थोडक्यात देणे मात्र खूपच कठीण जाते. नेतृत्त्वाचे आणखी एक गमक म्हणजे नेत्याची प्रेरणा देण्याची क्षमता किंवा मानवी कर्मशक्ती ही प्रेरणेवर काम करते असा सिध्दांत आहे. प्राचीन काळापासून प्रत्येक समाजात पुढारी आणि अनुयायी असे दोन वर्ग अस्तित्वात होते आणि आजही आहेत. समाजाच्या नेतृत्वाचे कार्य करणे हे पुढाऱ्यांचे आणि पुढाऱ्यांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करणे हे अनुयायांचे कार्य आहे. राजकीय जीवनातसुध्दा नेतृत्त्वाची आवश्यकता असते अशा राजकीय नेतृत्वाचे स्वरूप कोणते? ते नेतृत्व कोणाला आणि कोणत्या आधारावर प्राप्त होते? त्या नेतृत्वाचा अविष्कार कसा घडतो? इत्यादीचा अभ्यास राज्यशास्त्राच्या दृष्टीने करणे आज आवश्यक झाले आहे. प्रभाव पाडणारी व्यक्ती म्हणजेच पुढारी होय आणि प्रभावित झालेले लोक म्हणजेच अनुयायी होत. परिस्थिती बदलताच नेतृत्वातही बदल झालेला दिसतो. परिस्थिती नुसार अनुयायी आणि नेते हयांच्यामध्ये अदला-बदल होत असते. विकसनशील देशामध्ये नेते लोकच राष्ट्राची ध्येय धोरणे निश्चित करतात. नवीन विचारसरणी आणि चांगले नेतृत्त्व निर्माण होण्यासाठी शिक्षण आणि संस्कार हयांची गरज असते. आधुनिक काळात नेतृत्वाचा आणि नेतृत्व बदलाचा विचार करण्यात आला. पारंपारिक नेतृत्त्व प्रामुख्याने जात वर्ग किंवा विशिष्ट समूह हयांच्या सदस्यत्त्वामुळेच निर्माण झाले होते परंतु आधुनिक काळात लोकशाही आणि जनतेची सार्वभौम सत्ता हया संकल्पनांचा स्विकार आणि प्रसार झाला आहे.

राजकारण आणि राजकीय प्रक्रिया हयांचे स्वरूप जसजसे बदलत गेले तसतसे नेतृत्त्व पध्दतीत बदल घडत गेला. लोकशाही राजकीय व्यवस्थेत निवडणूकांना फार महत्त्व असते. निवडणुकीमुळे राजकीय नेतृत्त्वात बदल होतो, त्यामुळे कधीकधी तळाशी असलेले नेतृत्त्व शिखरापर्यंत पोहचते तर कधी शिखरावर असलेले नेतृत्त्व भूईसपाट होते.

पुर्वीचे राजकीय पुढारी समाजातील विशिष्ट स्तरातून निर्माण होत, आज परिस्थिती बदललेली आहे. नेतृत्व व व्यक्ती हयात फरक करण्यात येतो. राज्याची सत्ता संविधान आणि विधी यानुसार संघटीत झालेली आहे. सत्ता ही पदाला प्राप्त झालेली असते, व्यक्तीला नाही. पदाच्या सीमा एक प्रकारे मर्यादित झालेल्या असतात. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप या गुणावर आधारित पुर्वीची नेतृत्त्वाची कल्पना आज अमान्य झालेली आहे. नेतृत्त्वाचा अभ्यास आज दोन दृष्टीने होत आहे. लहान लहान गटांच्या आधारे नेतृत्वाचा अभ्यास करणे ही एक पध्दती आहे तर दुसरी पध्दती म्हणजे मोठया स्तरावर म्हणजे राष्ट्राच्या स्तरावर नेतृत्त्वाचा अभ्यास करणे ही होय.

अशा पध्दतीने नेतृत्त्व उदयाला येते. भारताने लोकशाहीचा पुरस्कार केला असल्यामुळे अनेक प्रकारची नेतृत्त्व उदयाला आली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे थोर महात्मे, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी अनेक थोर व्यक्तींच्या डोळयासमोर एक स्वप्न होते. या विचाराचा एक परिणाम म्हणून महाराष्ट्रातून अनेक ग्रामीण नेतृत्त्व पुढे येऊ लागली आणि प्रागतिक विचाराच्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील, यशवंतराव मोहिते, बाळासाहेब देसाई, भाऊसाहेब हिंरे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख असे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सहकार व शिक्षण क्षेत्रात नेतृत्त्व पुढे आले. या परंपरेत वाढलेले व स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे सांगली जिल्हयात व शिक्षणाचे माहेरघर पुण्यात कर्तृत्त्वाचा डोंगर उभा करणारे नेतृत्त्व म्हणजे डॉ.पतंगराव कदम होय. एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन ऐन विशीतील या तरूणाला सामाजिक विकासाच्या कल्पनेने का झपाटले? त्यांच्या कार्याचे प्रेरणास्रोत कोणते? सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचे सामाजिक योगदान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधून पतंगरावांच्या कार्याची सामाजिक, राजकीय, सहकार व शिक्षण या दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्त्वाचा विकास होत असताना त्या काळातील परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावर कसा होतो याचा सैध्दांतिक पातळीवर विचार करणे गरजेचे वाटते म्हणून यासंबंधी अभ्यास केलेला आहे. एखादया राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करीत असताना त्या कालखंडातील राजकीय विकासाची प्रक्रिया समजून घेता येवू शकते म्हणूनच हा विषय अभ्यासासाठी निश्चित करून सैध्दांतिक बाजूने संबंध राजकीय विकासाची प्रक्रिया समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाचा पुढील पाच भागाच्या आधारे अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ.पतंगराव कदम व्यक्तीपरिचय यामध्ये समाजशास्त्रज्ञ समाजाचे अध्ययन करताना मुख्यतः मानवी परस्पर संबंध, मानवी वर्तन केंद्रीभूत मानतात. दैनंदिन जीवनातील माणसांच्या परस्परांशी होणाऱ्या अंतरक्रियामधून सामाजिक जीवन आकार घेत असते. समाजामध्ये कुटुंब, धर्म, जात, खेडे शहर असे अनेक घटक असतात. हे सगळे सामाजिक घटक मानवी वर्तन प्रभावी करत असतात. समाजशास्त्रज्ञ समाज ही एक व्यवस्था मानतात.

समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा असतात. प्रत्येक समाजाची एक संस्कृती असते जीवन जगण्याची एक विशिष्ट पध्दत म्हणजे संस्कृती होय. अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांचा जन्म ज्या शेतकरी कुटुंबात झाला, ती संस्कृती, ते ज्या परिसरात लहानाचे मोठे झाले तेथील लोक, त्यांना लाभलेले मित्र, त्या लोकांच्या समस्या, डॉ.पतंगराव कदम यांना आलेल्या अनेक अडचणी त्याचा त्यांच्या मनावर खोलवर झालेला परिणाम या सर्व परिस्थितीला तोंड देत त्यांचे उभे राहिलेले नेतृत्व याचा अभ्यास या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वात असलेले शिक्षणविषयक विचार महत्त्वाचे आहेत. शिक्षणमहर्षि कर्मवीर भाऊ राव यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिकलेले व त्यांच्या संस्कारात वाढलेले डॉ.पतंगराव कदम यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान याचा अभ्यास या ठिकाणी केला आहे. पुण्यातील कसबा पेठेतील १०×१० च्या खोलीत तत्कालीन परिस्थितीची गरज ओळखून 'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' या विचाराने प्रेरीत होऊन १० मे १९६४ साली गणित व इंग्रजी या परीक्षा घेऊन एक शिक्षण संस्था स्थापन केली, नुसती शिक्षण संस्था स्थापन करून ते थांबले नाहीत तर शिक्षणाची गंगा शहराकडून खेडयाकडे पोहचवली व त्याचे एका अभिमत विद्यापीठात रूपांतर केले. भारतामध्ये अभिमत विद्यापीठाचे जे पाच तहहयात कुलपती आहेत त्यामध्ये डॉ.पतंगराव कदम एक आहेत. डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षणसंस्थांची वेगळी मांडणी केली आहे. शिक्षण संस्था उभारत असताना त्यामध्ये कोणता अभ्यासक्रम असावा, त्यासाठी लागणारा शिक्षक वर्ग कसा असावा, त्यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा, यातून विद्यार्थ्यांची होणारी जडण-घडण याचा आदर्श संपूर्ण भारतभर घालून दिला आहे याचा अभ्यास या

भागामध्ये केला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य यामध्ये ते ज्या समाजव्यवस्थेतून पुढे आले त्या समाजाने उपभोगलेले दारिद्र्य, गरीबी यांचा खोलवर परिणाम डॉ.पतंगराव कदम यांच्यावर झाला म्हणून त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेत ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा ठेवल्या आहेत तसेच स्वतंत्र विभाग सुरू केले आहेत. कडेगांव (सांगली) सारख्या माळरानावर मुलींसाठी भव्य असे शैक्षणिक संकुल उभे केले आहे. त्यामध्ये गरीब मुलींसाठी मोफत सुख-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महात्मा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली व सामाजिक कार्याचा आदर्श संपूर्ण भारतभर घालून दिला त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन ग्रामीण भागातील महिला शिकल्या पाहिजेत म्हणून अनेक गावातून कन्या प्रशाला, मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहे काढली आहेत तसेच ग्रामीण भागातील लोकांना अल्प दरामध्ये त्यांच्या आरोग्याची काळजी घेता यावी म्हणून सातशे खाटांचे सर्व सोयी-सुविधायुक्त भारती हॉस्पिटल स्थापन केले आहे. ग्रामीण भागातील खेळाडू खेळात पाठीमागे पडू नयेत म्हणून कराड येथे सर्व सुविधायुक्त असे क्रीडा संकुल उभारणीचे काम चालू आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांसाठी वैचारिक व्यासपीठ म्हणून 'विचार-भारती' हे मासिक चालू केले आहे. या सर्वांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचे राजकीय कार्य यामध्ये डॉ.पतंगराव कदम यांना घराण्याचा कोणताही वारसा नसताना त्या परिस्थितीतही आमदार होण्याचे स्वप्न पाहिले. स्वप्न सर्वजण पाहतात, स्वप्न सत्यात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. राजकीय नेतृत्त्व प्रस्थापित करण्यासाठी लोकांची अधिमान्यता मिळवावी लागते. समाजाच्या प्रश्नांची जाण असावी लागते. ती सोडविण्यासाठी निर्णायक वृत्ती असली पाहिजे. डॉ.पतंगराव कदम राजकीय कार्य करीत असल्यापासून अनेक राजकीय वादळे आली परंतु पूर्वीपासून ते काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले आहेत व पक्ष बांधणीसाठी सातत्याने प्रयत्न केला आहे म्हणूनच काँग्रेस पक्षामध्ये त्यांना महत्वाचे स्थान आहे. डॉ.पतंगराव कदम यांचे राजकीय नेतृत्त्व प्रस्थापित होत असताना त्यांना यशवंतराव मोहिते, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई यांनी सहकार्य केले आहे. त्यांच्या विचाराचा डॉ.पतंगराव कदम यांच्यावर झालेल्या परिणामाची सैध्दांतिक मांडणी या

विभागात केलेली आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचे सहकार व आर्थिक क्षेत्रातील कार्य यामध्ये डॉ.पतंगराव यांनी शिक्षण व सहकार याचा समन्वय साधला आहे. डॉ.पतंगराव यांनी त्यांचे कार्य राजकीय व सामाजिक क्षेत्रात मर्यादित न ठेवता सहकार क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. भिलवडी-वांगी या कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त मतदार-संघात सोनहिरा सहकारी साखर कारखाना, सागरेश्वर सहकारी सूतगिरणी, सोनहिरा सहकारी दूध प्रकल्प व कृषीपूरक उद्योग, सोनहिरा सहकारी कुक्कुटपालन संघ, भारती सहकारी बँक, भारती सहकारी बझार, अनेक पतपेढया व डॉ.पतंगराव कदम पाणी-पुरवठा संस्था स्थापन करून त्या उत्तमरीतीने चालवल्या आहेत व अनेक सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या मिळवून दिल्या आहेत व अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे व भिलवडी-वांगी मतदार संघाचा कायापालट केला आहे व खऱ्या अर्थाने यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील, धनंजयराव गाडगीळ या सहकारमहर्षींचा विचार पुढे चालवला आहे याचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

या शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक शोध पध्दतीचा वापर केलेला आहे. यात शासकीय कागदपत्रे, पक्षाची प्रकाशित पत्रके व पुस्तिका, वृत्तपत्रे, नियतकालिके, संशोधन पत्रिका, शोधनिबंध व ग्रंथालयातील पुस्तके यांचा मुख्यत्वे वापर करण्यात आलेला आहे. या साधनाबरोबर डॉ.पतंगराव कदम यांच्या सहवासातील सहकारी व्यक्तींशी चर्चा करून तसेच डॉ.पतंगराव कदम वाढदिवस विशेषांक, डॉ.पतंगराव कदम यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक व सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल यांचाही आधार घेण्यात आला आहे.

या शोधनिबंधाचा अभ्यास करीत असताना शिवाजी विद्यापीठातील बॅ.खर्डेकर ग्रंथालय कोल्हापूर; भारती अभिमत विद्यापीठ ग्रंथालय पुणे; शिवाजी विद्यापीठ अभ्यास केंद्र ग्रंथालय कोल्हापूर ; यशवंतराव मोहिते महाविद्यालय ग्रंथालय पुणे, दै.लोकसत्ता (पुणे), दै.पुढारी (सांगली), दै.सकाळ (कोल्हापूर), दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.केसरी (सांगली)इ.

अशा प्रकारच्या विविध साधनांच्या आधारे 'डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्त्व एक राजकीय अभ्यास' या शोधनिबंधाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. या

शोधनिबंधाचा उपयोग २१ व्या शतकात भेडसावणारे प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित होईल. डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्त्वाखाली भिलवडी-वांगी मतदार संघात जे उद्योग उभे राहिले व पुण्यासारख्या ठिकाणी जे शैक्षणिक विद्यापीठ उभे राहिले याचा आदर्श घेऊन इतरत्र असे कार्य करण्यास चालना मिळू शकते. भारतासारख्या देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी डॉ.पतंगराव कदम यांचे सारखे कर्तृत्त्ववान नेतृत्त्व प्रत्येक मतदार संघात निर्माण होणे आवश्यक आहे. तरच भारत प्रगतीचे दिशेने वाटचाल करेल.

****